जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

10 FEB 2023

# घाटगे घराणे आणि करवीर संस्थान यांचे दृढ संबंध

## श्रीमंत शाहू छत्रपती महाराज; 'घाटगेज द राईज ऑफ ए रॉयल डायनेस्टी' पुस्तकाचे प्रकाशन

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता.९ : 'घाटगे घराणे आणि करवीर संस्थान यांचे संबंध पूर्वापार आहेत. करवीर संस्थांनचे दुसरे संभाजी महाराज आणि घाटगे घराणे यांची जवळीक अधिक होती. त्यानंतरच्या सर्वच पिढ्यांनी हे संबंध वृद्धिंगत केले,' असे प्रतिपादन श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी केले. आज त्यांच्या प्रमुख उपस्थितीत नंदीतादेवी घाटगे लिखित 'घाटगेज द राईज ऑफ ए रॉयल डायनेस्टी' आणि 'बायजाबाई ज ज्वेल इन द मराठा क्राऊन' या दोन पुस्तकांचे प्रकाशन झाले. हॉटेल पॅव्हेलियनमध्ये सोहळा झाला.




कोल्हापूर : 'घाटगेज द राईज ऑफ ए रॉयल डायनेस्टी' चे बुधवारी (ता.९) प्रकाशन करताना समरजितसिंह घाटगे, नंदीतादेवी घाटगे, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, डॉ.डी.टी.शिर्के, प्रवीणसिंह घाटगे, सुहासिनीदेवी घाटगे.

श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, 'घाटगे घराण्याला मोठा वारसा आहे. बहुतांश मराठा घराणी राजस्थानातून दक्षिणेत आली. महाडिक, शिर्के, घाटगे, डफळे यांचाही त्यामध्ये समावेश आहे. घाटगे आणि शहाजीराजे भोसले आदिलशहाच्या दराहबारात होते. त्यांची मैत्री होती. घाटगे घराण्यातून राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे करवीर संस्थानात दत्तक आले. शाहू महाराजांनी आधुनिक भारताचा पाया रचला. करवीर संस्थानमधील दुसरे संभाजीराजे यांचे आणि घाटगे घराण्याचे संबंध अधिक जवळचे होते. पुढच्या पिढीतही ते वृद्धिंगत झाले. नंदीतादेवी घाटगे यांनी लिहिलेल्या पुस्तकातून इतिहासातील अनेक पदर उलगडले आहेत.'

कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के म्हणाले, 'घाटगे घराण्याला मोठा इतिहास आहे तो या पुस्तका संकलित झाला. एखाद्या इतिहास संशोधकाला लाजवेल अशी संदर्भासह मांडणी केली आहे. या पुस्तकाचा मराठीत अनुवाद व्हावा.'

नंदीतादेवी घाटगे म्हणाल्या, 'घाटगे घराणे मूळचे राजस्थानचे आहे. आदिलशहा, छत्रपती शिवाजी महाराज, ईस्ट इंडिया कंपनी आणि नंतर ब्रिटिश या सर्व शासनकर्त्यांशी त्यांचा संबंध आला. या घराण्याने अनेक पराक्रमी योद्धे देशाला दिले. हा सहाशे वर्षांचा इतिहास प्रेरणादायी ठरेल.' शाहू कारखान्याच्या अध्यक्षा सुशीलादेवी घाटगे, गोकुळच्या संचालिका शौमिका महाडिक, माजी आमदार अमल महाडिक हे उपस्थित होते. शाहू उद्योग समूहाचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे यांनी प्रास्ताविक केले. नवोदिता घाटगे यांनी आभार मानले.

### 'त्यांना' शिवसेनेचे तिकीट मिळाले.

■ श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, 'मी विक्रमसिंह राजे यांच्या आधी शिवसेनेत प्रवेश केला. लोकसभेचे तिकीट मला मिळेल, अशी मला आशा होती. पण, ते माझ्यानंतर शिवसेनेत आलेल्या राजे विक्रमसिंह घाटगे यांना मिळाले, तरीही आमचे संबंध मैत्रीचे होते.'

10 FEB 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू महाराज म्हणजे घाटगे घराण्याची देण होय

## शाहू महाराज : 'घाटगेज द राईज ऑफ अ रॉयल डायनेस्टी'चे प्रकाशन



कोल्हापुरात 'घाटगेज द राईज ऑफ अ रॉयल डायनेस्टी' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन गुरुवारी शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते शानदार सोहळ्यात झाले. यावेळी समरजित घाटगे, नंदिता घाटगे, डॉ. डी. टी. शिर्के, प्रवीणसिंह घाटगे, सुहासिनीदेवी घाटगे उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराजांच्या रूपाने कोल्हापूरकरांना दूरदृष्टीचा राजा मिळाला, ही घाटगे घराण्याची देण आहे, असे प्रतिपादन शाहू महाराज छत्रपती यांनी गुरुवारी येथे केले.

घाटगे घराण्याचा उदय आणि विकास (१३९८ ते २०२२) यावर प्रकाश टाकणाऱ्या 'घाटगेज : द राईज ऑफ अ रॉयल डायनेस्टी' आणि 'बायजाबाई : द ज्वेल इन द इंडिया' या नंदिता घाटगे यांनी अभ्यासपूर्ण लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन शाहू महाराज यांच्या हस्ते झाले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. शाहू महाराजांनी छत्रपती घराणे आणि जनक घाटगे घराण्याच्या मैत्रीपूर्ण संबंधांवर प्रकाश टाकला. शाहू महाराज म्हणाले, "राजर्षी शाहू महाराजांच्या रूपाने कोल्हापूरकरांना दूरदृष्टीचा राजा मिळाला, ही घाटगे घराण्याची देण आहे. त्यांच्यामुळेच शाहू महाराजांच्या शैक्षणिक, शेतीपूरक, सामाजिक, आर्थिक विकासासह सर्व क्षेत्रातील प्रगल्भ आणि पुरोगामी विचार राज्याला मिळाले आहेत. नंदिता घाटगे या राजघराण्याच्या स्नुषा आहेत. त्यांनी घाटगे घराण्याचा सहाशे वर्षांचा इतिहास पुस्तकातून अतिशय सुबकरितीने मांडला, त्यांचे कौतुक केले पाहिजे."

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, "इतिहासतज्ज्ञांना लाजवेल, असा दस्तावेज नंदितादेवींनी देत घराण्याचे स्वप्न पूर्ण केले. या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद मराठी वाचकांसाठी उपलब्ध करून द्यावा."

पुस्तकाच्या लेखिका नंदिता म्हणाल्या, "विक्रमसिंहराजे घाटगे यांचे स्वप्न या पुस्तकाच्या रूपाने पूर्ण झाले आहे. छत्रपती आणि घाटगे घराण्याने कोल्हापूरच्या विकासासाठी एकत्रित पावले उचलली आहेत, त्याचा लेखाजोखा यात मांडला आहे. या कार्यक्रमात केशव जाधव, गणेश खोडके, नीलांबरी जगताप, लीना ठक्कर, प्रवीण रणदिवे, नंदिनीराजे तोरगलकर, राहुल शिरोडकर, सई बेलेकर, रविराज निंबाळकर, अमेय जाधव, अण्णासाहेब कुंभार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सुहासिनीदेवी घाटगे, प्रवीणसिंह घाटगे, समरजित घाटगे उपस्थित होते. श्रेयादेवी घाटगे यांनी स्वागत केले. नवेदिता घाटगे यांनी आभार मानले. यावेळी मृगेंद्रसिंह घाटगे, मालोजीराजे, अमल महाडिक, शौमिका महाडिक, आदी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठातील ५,६०१ विद्यार्थ्यांनी दिल्या परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील १४ पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा गुरुवारी वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी एकूण ५,६०१ विद्यार्थी उपस्थित होते.

यापूर्वी बीए, बीकॉम आणि बीएस्सीच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांकडून घेण्यात येत होत्या. विद्यापीठ वेळापत्रक ठरवून महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका पुरवित होत्या, मात्र आता वेळापत्रक व प्रश्नपत्रिकेसोबत परीक्षा घेण्याची जबाबदारी महाविद्यालयांकडे सोपविण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीने आंदोलनाचा निर्णय घेतल्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर /नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षांच्या कामकाजावर त्यांचा बहिष्कार होता. मात्र, अधिविभागातील अधिविभागप्रमुख, शिक्षक, महाविद्यालयातील प्राचार्य, संपात सहभाग नसलेले शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांच्या सहकार्याने परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या आहेत.

सकाळ



# शारदाबाई पवार अध्यासनातर्फे बुधवारी चर्चासत्र

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे बुधवारी (ता. १५) फुले, शाहू आणि आंबेडकर यांचा स्त्रीवादी दृष्टिकोन या विषयावर चर्चासत्र होणार आहे. त्याचे उद्‌घाटन सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते होणार आहे. 'छत्रपती शाहू महाराज आणि स्त्री उन्नती' या पुस्तकाचे प्रकाशन प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि अध्यासनाच्या सल्लागार समितीच्या सदस्य विजया पाटील यांच्या उपस्थितीत होईल. डॉ. उमेश बगाडे, प्रतिमा परदेशी, छाया पवार, मंजुश्री पवार, रमेश जाधव, धम्मसंगिनी रमा गोरख, नंदा पारेकर विचार मांडणार आहेत.

पुढारी



# शिवाजी विद्यापीठ परीक्षांना ५,६०० विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत गुरुवारी १४ अभ्यासक्रमांसाठी सुमारे ५ हजार ६०१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

गुरुवारी एमए, एमएस्सी, एमबीए, एमसीए, एमएसडब्ल्यू, डिप्लोमा इन टॅक्सेशन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन कॉम्प्युटर, बी. आर्किटेक्चर, मास्टर ऑफ आर्टस् आदी १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. पथकाकडून जिल्ह्यातून तीन गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
10 FEB 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : कणेरी मठ येथे दि. २० फेब्रुवारीपासून सुमंगलम् पंचमहाभूत महोत्सव सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या संरक्षक भिंतीवर कोल्हापूरचे वैविध्य दर्शविणाऱ्या कलात्मक व प्रबोधनात्मक कलाकृती साकारण्यात आल्या आहेत. (छाया: अर्जुन टाकळकर)

पुढारी

# विद्यापीठात १५ रोजी ‘फुले, शाहू, आंबेडकर यांचा स्त्रीवादी दृष्टिकोन’ विषयावर चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या वतीने १५ फेब्रुवारी रोजी ‘फुले, शाहू व आंबेडकर यांचा स्त्रीवादी दृष्टिकोन’ या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. अध्यासन सल्लागार समिती सदस्य विजया पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ज्येष्ठ अभ्यासक डॉ. उमेश बगाडे, औरंगाबाद हे बीजभाषण करणार आहेत. चर्चासत्रात प्रतिमा परदेशी, डॉ. छाया पवार, डॉ. मंजुश्री पवार, डॉ. धम्मसंगिनी गोरख या मार्गदर्शन करणार आहेत.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू असून, आज ९ फेब्रुवारीला १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. ५६०१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्या.

दरम्यान, कोल्हापूर जिल्ह्यात तीन कॉपी प्रकरणांची नोंद झाली, तर सांगली व सातारा जिल्ह्यात एकही कॉपी प्रकरण आढळले नाही. महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती यांनी विविध मागण्यांसाठी आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार असताना अधिविभागातील अधिविभागप्रमुख, शिक्षक, महाविद्यालयातील प्राचार्य, संपात सहभाग नसलेले शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांच्या सहकार्याने परीक्षा सुरळीतपणे सुरू आहेत. तसेच २ ते ४ फेब्रुवारी या कालावधीत स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांची सुधारित वेळापत्रके संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहेत.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.

सकाळ

# टेरारियम कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अभ्यासक्रम समाजाभिमुख आहेत, असे प्रतिपादन डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. टेरारियम कार्यशाळेत ते बोलत होते. टेरारियम व्यावसायिक दृष्टिकोन; आर्थिक गुणवत्ता वाढवणारा कार्यक्रम असल्याचे संचालक डॉ. आर. जी. पवार यांनी सांगितले. अक्षय घोरपडे, अभिजित जाधव यांनी मार्गदर्शन केले.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठांतर्गत विविध परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बुधवारी पदवी व पदव्युत्तरच्या १४ अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. ५ हजार ६०१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षेत तीन गैरप्रकार उघडकीस आले आहेत. संबंधितांची चौकशी परीक्षा प्रमाद समितीकडे होणार आहे.